**L. A. BILL No. XXXIII OF 2026.**

A BILL
FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA GOODS AND SERVICES TAX ACT, 2017.

## सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३३.

**महाराष्ट्र वस्तू व सेवा कर अधिनियम, २०१७ यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक.**

२०१७ चा महा. ४३.

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र वस्तू व सेवा कर अधिनियम, २०१७ यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या सत्त्याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र वस्तू व सेवा कर (सुधारणा) अधिनियम, २०२६, असे म्हणावे.

(२) तो, राज्य शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियत करील अशा दिनांकास, भविष्यलक्षी किंवा भूतलक्षी प्रभावाने, अंमलात येईल आणि या अधिनियमाच्या विविध तरतुदींसाठी वेगवेगळे दिनांक नेमून देण्यात येतील.

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या कलम १५ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र वस्तू व सेवा कर अधिनियम, २०१७ (यात यापुढे ज्याचा निर्देश, "मुख्य अधिनियम" असा केला आहे) याच्या कलम १५ मध्ये, पोट-कलम (३) मधील, खंड (ख) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येईल :—

२०१७ चा महा. ४३.

"(ख) पुरवठा करण्यात आल्यानंतर, अशा सवलतीसाठी, पुरवठादाराकडून जमापत्र काढण्यात आले असेल आणि कलम ३४ च्या तरतुदींनुसार, पुरवठ्याच्या प्राप्तकर्त्याने अशा सवलती इतकी निविष्टी कराची जमा रक्कम परत केलेली असेल तर.".

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या कलम ३४ ची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३४ मध्ये, पोट-कलम (१) मधील, "दोन्हींची जेथे कमतरता आढळून येते" या मजकुरानंतर, "किंवा जेथे कलम १५ च्या पोट-कलम (३) च्या खंड (ख) मध्ये निर्दिष्ट केलेली सवलत दिलेली असेल" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या कलम ५४ ची सुधारणा.

**४.** मुख्य अधिनियमाच्या कलम ५४ मध्ये,-

(क) पोट-कलम (६) मधील, "वस्तू किंवा सेवा किंवा दोन्हींच्या शून्याधारित पुरवठ्यामुळे" या मजकुरानंतर, "किंवा पोट-कलम (३) च्या पहिल्या परंतुकाच्या खंड (दोन) अन्वये न वापरलेल्या निविष्टी कराच्या जमा रकमेच्या" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल;

(ख) पोट-कलम (१४) मधील, "पोट-कलम (५) किंवा पोट-कलम (६) अन्वये" या मजकुरानंतर, "ज्या प्रकरणांमध्ये भारताबाहेर निर्यात केलेल्या वस्तूंवर कर प्रदान करून कर परताव्याचा दावा केला असेल त्या प्रकरणांव्यतिरिक्त" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

वस्तू व सेवा कर परिषदेद्वारे, वस्तू व सेवा कर कायद्यांमध्ये आवश्यक सुधारणा करणारे अनेक निर्णय तिच्या बैठकांमध्ये घेण्यात आलेले आहेत. त्यानुसार, संसदेने वित्त अधिनियम, २०२६ (२०२६ चा ४) द्वारे केंद्रीय वस्तू व सेवा कर अधिनियम (२०१७ चा १२) यामध्ये सुधारणा केलेली आहे. उपरोक्त बैठकीमध्ये वस्तू व सेवा कर परिषदेने घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी आणि केंद्रीय वस्तू व सेवा कर अधिनियम, २०१७ आणि महाराष्ट्र वस्तू व सेवा कर अधिनियम,२०१७ (२०१७ चा महा. ४३) यांच्या तरतुदींच्या प्रयोज्यतेमध्ये एकरूपता राखण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र वस्तू व सेवा कर अधिनियम, २०१७ यात सुधारणा करणे इष्ट आहे.

**२.** प्रस्तावित सुधारणांची ठळक वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत :—

(एक) विक्री-पश्चात सवलत करारनाम्यासोबत जोडण्याची आवश्यकता दूर करण्यासाठी आणि जेथे प्राप्तकर्त्याने निविष्टी कराची जमा रक्कम परत केलेली असेल तेथे, कलम ३४ अन्वये जमापत्र काढण्यासाठी निर्देश देण्यासाठी कलम १५ च्या पोट-कलम (३) चा खंड (ख) बदली दाखल करणे;

(दोन) जमापत्र व नावेपत्राशी संबंधित उक्त तरतुदींमधील कलम १५ चा संदर्भ समाविष्ट करण्यासाठी कलम ३४ च्या पोट-कलम (१) मध्ये सुधारणा करणे;

(तीन) व्यस्त शुल्काच्या संरचनेतून उद्भवलेल्या परताव्यांचा तात्पुरत्या स्वरूपात परतावा देण्याच्या सुविधेत वाढ करण्यासाठी कलम ५४ च्या पोट-कलम (६) मध्ये सुधारणा करणे;

(चार) कराच्या प्रदानासह भारताबाहेर निर्यात केलेल्या वस्तूंच्या संबंधातील परतावा दाव्यांच्या मंजुरीसाठी असलेल्या मर्यादा काढून टाकण्यासाठी कलम ५४ च्या पोट-कलम (१४) मध्ये सुधारणा करणे.

**३.** वरील उद्दिष्टे साध्य करणे हा या विधेयकाचा हेतू आहे.

मुंबई,
दिनांक १५ जून २०२६.

**देवेंद्र फडणवीस,**
मुख्यमंत्री.

## वैधानिक अधिकार सोपवण्यासंबंधीचे ज्ञापन.

या विधेयकात वैधानिक अधिकार सोपवण्यासंबंधीचा पुढील प्रस्ताव अंतर्भूत आहे :—

**खंड १(२).—** या खंडान्वये, या अधिनियमाच्या तरतुदी भूतलक्षी किंवा भविष्यलक्षी प्रभावाने ज्या दिनांकास अंमलात येतील तो दिनांक, आणि या अधिनियमाच्या वेगवेगळ्या तरतुदींसाठी वेगवेगळे दिनांक **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियत करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

२. वैधानिक अधिकार सोपवण्यासंबंधीचा वर नमूद केलेला प्रस्ताव सामान्य स्वरूपाचा आहे.

## वित्तीय ज्ञापन.

वस्तू व सेवा कर परिषदेने घेतलेल्या निर्णयांची अंमलबजावणी करण्याकरिता आणि केंद्रीय वस्तू व सेवा कर अधिनियम,२०१७ (२०१७ चा १२) आणि महाराष्ट्र वस्तू व सेवा कर अधिनियम,२०१७ (२०१७ चा महा. ४३) यांच्या तरतुदींच्या प्रयोज्यतेतील एकरूपता राखण्यासाठी महाराष्ट्र वस्तू व सेवा कर अधिनियम,२०१७ (२०१७ चा महा. ४३) याच्या विविध कलमांमध्ये विवक्षित सुधारणा केल्या आहेत.

या विधेयकात, राज्य विधानमंडळाचा अधिनियम म्हणून अधिनियमित झाल्यावर, राज्याच्या एकत्रित निधीतून करावयाच्या आवर्ती किंवा अनावर्ती खर्चाच्या कोणत्याही तरतुदीचा अंतर्भाव नाही.

(शा.म.मु.) एचबी ४६८–३ (१०४०–६–२०२६)

## भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २०७ अन्वये राज्यपालांची शिफारस

(महाराष्ट्र शासन, विधि व न्याय विभाग, आदेशाची प्रत)

भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २०७ याच्या खंड (१) अन्वये महाराष्ट्राच्या राज्यपालांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करून, ते महाराष्ट्र वस्तू व सेवा कर (सुधारणा) विधेयक, २०२६ पुरःस्थापनार्थ घेण्याबाबत महाराष्ट्र विधानसभेस शिफारस करीत आहेत.

**सन २०२६ चे वि.स.वि. क्र. ३३.—महाराष्ट्र वस्तू व सेवा कर (सुधारणा) विधेयक, २०२६ याचे परिशिष्ट.**

**(महाराष्ट्र वस्तू व सेवा कर अधिनियम, २०१७ यातील उतारे)**

**( सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३)**

**१.** ते **१४.** *** *** ***

**१५.** (१) व (२) *** *** *** करपात्र पुरवठ्याचे मूल्य.

(३) पुरवठा मूल्यामध्ये अशा कोणत्याही सवलतीचा अंतर्भाव असणार नाही, जर,—

(क) *** *** ***

(ख) अशी सवलत पुढीलप्रमाणे, पुरवठा करण्यात आल्यानंतर दिलेली असेल तर,—

(एक) असा पुरवठा करतेवेळी किंवा त्यापूर्वी केलेल्या करारनाम्यानुसार प्रस्थापित झालेली अशी सवलत दिलेली असेल आणि संबंधित बीजकांशी ती विनिर्देशपूर्वक निगडित असेल ; आणि

(दोन) प्राप्तकर्त्याने सवलती इतकी निविष्टी कराची जमा रक्कम पुरवठादाराने दिलेल्या दस्तऐवजाच्या आधारे परत केलेली असेल.

(४) व (५) *** *** ***

**१६.** ते **३३.** *** *** ***

**३४.** (१) कोणत्याही वस्तू किंवा सेवा किंवा दोन्हींचा पुरवठा करण्याकरिता जेथे कराची एक किंवा अधिक बीजके देण्यात येते आणि करपात्र मूल्य किंवा त्या कर बीजकामध्ये आकारलेला कर हा करपात्र मूल्य किंवा अशा पुरवठ्याबाबत देय असलेल्या करापेक्षा अधिक असल्याचा आढळते, किंवा पुरवठा केलेल्या वस्तू जेथे प्राप्तकर्त्यांकडून परत केल्या जातात, किंवा पुरवठा केलेल्या वस्तू किंवा सेवा किंवा दोन्हींची जेथे कमतरता आढळून येते; अशा वेळी जिने असा वस्तू किंवा सेवा किंवा दोन्हींचा पुरवठा केलेला असेल अशा नोंदणीकृत व्यक्तीस विहित करण्यात येईल अशा तपशिलाचा अंतर्भाव असलेली वित्तीय वर्षात केलेल्या पुरवठ्यांची एक किंवा अधिक जमापत्रे प्राप्तकर्त्यांला देता येतील. जमापत्र आणि नावेपत्र.

(२) ते (४) *** *** ***

**३५.** ते **५३.** *** *** ***

**५४.** (१) ते (४) *** *** *** कराचा परतावा.

(५) असा कोणताही अर्ज मिळाल्यावर जर समुचित अधिकाऱ्याची अशी खात्री पटली असेल की,. परतावा म्हणून दावा केलेली संपूर्ण रक्कम किंवा रकमेचा भाग परतावा योग्य आहे तर त्यास, तद्नुसार आदेश काढता येईल आणि कलम ५७ मध्ये निर्दिष्ट केलेली अशा प्रकारे निश्चित केलेली रक्कम निधीमध्ये जमा करण्यात येईल.

(६) पोट-कलम (५) मध्ये काहीही अंतर्भूत केलेले असले तरी, समुचित अधिकाऱ्यास, परिषदेच्या शिफारशीवरून, शासनाकडून अधिसूचित करण्यात येईल अशा नोंदणीकृत व्यक्तींच्या प्रवर्गाव्यतिरिक्त नोंदणीकृत व्यक्तींनी केलेल्या वस्तू किंवा सेवा किंवा दोन्हींच्या शून्याधारित पुरठ्यामुळे परताव्याचा कोणताही दावा केलेला असल्यास, विहित करण्यात येईल अशा रीतीने आणि अशा शर्ती, मर्यादा व संरक्षक उपाययोजना यांना अधीन राहून, तात्पुरत्या स्वरूपात स्वीकारण्यात आलेली निविष्टी कराची जमा रक्कम वगळून, अशा प्रकारे दावा केलेल्या एकूण रकमेच्या नव्वद टक्के इतक्या रकमेचा तात्पुरत्या स्वरूपात परतावा देता येईल आणि त्यानंतर अर्जदाराने सादर केलेल्या कागदपत्रांची येथोचित पडताळणी केल्यावर, दावा केलेला परतावा अंतिमतः चुकता करण्यासाठी पोट-कलम (५) अन्वये आदेश देता येईल.

(७) ते (१३) *** *** ***

(१४) या कलमात काहीही अंतर्भूत असले तरी, जर परताव्याची रक्कम एक हजार रुपयांपेक्षा कमी असेल तर पोट-कलम (५) किंवा पोट-कलम (६) अन्वये अर्जदारास कोणताही परतावा देण्यात येणार नाही.

(१५) *** *** ***

**५५. ते १७४.** *** *** ***

**अनुसूची.** *** *** ***

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३३.]**

**[महाराष्ट्र वस्तू व सेवा कर अधिनियम, २०१७ यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक. ]**

**[श्री. देवेंद्र फडणवीस,**

मुख्यमंत्री.]

**जितेंद्र भोळे,**

सचिव-१,

महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.